# ।। अथ प्रश्न उत्तरच्या अंगाच्या अर्थाचे भाषांतर लि.।।

## मारवाडी+मराठी

## सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। प्रश्न उत्तरच्या अंग ।।

प्रश्न – कर्म कोण करवते?
उत्तर – कर्म चाहना करवते.
प्रश्न – चाहणा कशी उपजते?
उत्तर – चाहणा भुख,तहान,पिडेने
प्रश्न – बुध्दी भ्रष्ट कशाने होते?
उत्तर – काम जागृत झाल्याने
प्रश्न – काम कसे थांबते?
उत्तर – परमात्म्याची लाज शरम मर्यादा ठेवल्याने.
प्रश्न – शरम,लाज,मर्यादा कोण ठेवतो?
उत्तर– जीव
प्रश्न – कुबुध्दी कशाने येते?
उत्तर – अति खुशालीने
प्रश्न – निंदा कशाने येते?
उत्तर – द्वेष,मत्सरने
प्रश्न – द्वेष कशाने येतो?
उत्तर – गर्व,गुमान(अहंकार)
प्रश्न – गर्व,गुमानचे मूळ कोण?
उत्तर – अज्ञान
प्रश्न – अज्ञान कशाने येते?
उत्तर – अहंकाराने
प्रश्न – अहंकार कोणाला होतो?
उत्तर – हलकी निच बुध्दीवाल्याला.
प्रश्न – आपा म्हणजे मी,मी कशाने होते?
उत्तर – अभिमानाने.
प्रश्न – सुध्द बुध्द कशाने गेली?
उत्तर – क्रोधाने जाते व शुध्द गेल्याने बुध्दी जाते.
प्रश्न – नीच स्वभावाचे लक्षण काय?
उत्तर – दुसऱ्यांची चुगली करणे.
प्रश्न – चुगली कोण करवितो?
उत्तर – हलके चित्त

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

प्रश्न – मान कोण चाहतो?
उत्तर – मन
प्रश्न – मन हीण म्हणजे कमजोर कशाने होते?
उत्तर – दत्त म्हणजे धन न राहण्याने
प्रश्न – शोभा मान या सर्वांची चाहणा कोणाला?
उत्तर – मनाला
प्रश्न – शील विश्वास संतोष कशाने येतो?
उत्तर – अनुभवाने
प्रश्न – परमारथ कार्य कोण करतो?
उत्तर – सतस्वरुपी साधू
प्रश्न – साधू परके कार्य कसे करतो?
उत्तर – जीवांना आपल्या शरणात घेऊन जीवांना काळापासून मुक्त करतो.
प्रश्न – साधुची सेवा बंदगी कशाने होते?
उत्तर – भावाने
प्रश्न – धर्म पुण्य कसे करावे?
उत्तर – प्रमोदाने
प्रश्न – शरम लाज कशाने ठेवतो?
उत्तर – मोठ्यांच्या मान मर्यादेने
प्रश्न – मान मर्यादेचे बंधन काय?
उत्तर – रामजीचे व उत्तम विवेकी लोकांचे भय
प्रश्न – गोड आणि निर्मळ बोली कशाने?
उत्तर – वचन विचार करुन बोलल्याने
प्रश्न – ईश्वर मिळण्याचे उपकार कोणी केले?
उत्तर – गुरुने
प्रश्न – ध्यान,ज्ञानाची विवेक समज कोठून मिळाली?
उत्तर – सतस्वरुप साधूच्या संगाने
प्रश्न – भक्ती करण्याचा योग कोण सांगतो?
उत्तर – सतगुरु
प्रश्न – भक्ती करण्याचा स्वभाव कशाने येतो?
उत्तर – भक्तीच्या भाग्य कर्माने
प्रश्न – ब्रम्ह भक्तीचा भेद कशाने मिळतो?

उत्तर – पूर्वीच्या कमाईने
प्रश्न – लघुताई कोण देतो ?
उत्तर – चाह
प्रश्न – मनात तलब(चाहा)कशाने लागते ?
उत्तर – पूर्व जन्माच्या अंकुर ने
प्रश्न – भेद कशाने मिळतो ?
उत्तर – भावाने
प्रश्न – भेद कशाने येतो ?
उत्तर – प्रेमाने
प्रश्न – प्रेम कशाने येते ?
उत्तर – प्रीतीने
प्रश्न – त्याग कशाने येतो ?
उत्तर– तर्काने
प्रश्न – जग कशाने सोडतो ?
उत्तर – वैराग्याने
प्रश्न – वैराग्य कशाने उपजते
उत्तर – मतज्ञानाने
प्रश्न – जीव कशाने जागृत(हुशार)होतो.
उत्तर – शब्दाने
प्रश्न – शब्द कोणता ?
उत्तर – ब्रम्हचा संदेश
प्रश्न – ब्रम्हचा संदेश कोणता ?
उत्तर – गुरु वाक्य(वचन)
प्रश्न – गुरु वचनाचे सुख कशाने येते ?
उत्तर – परतित आणि विश्वास आल्याने
प्रश्न – सर्व रोग(चौऱ्यांशी आणि नरकाचा)केंव्हा मिटेल ?
उत्तर – गर्भात जन्मणे सुटल्यावर.
प्रश्न – जन्मणे मरणे दुविधा कशाने मिटेल ?
उत्तर – मोक्ष मिळाल्याने
प्रश्न – जीवाची जात काय ?
उत्तर – जीवाची जात ब्रम्ह.

प्रश्न – ब्रम्हचा गुरु कोण?
उत्तर – सतस्वरुप ज्ञान.
प्रश्न – जीवाचे आई वडील कोण?
उत्तर – जीवाचे आई वडील नाही आहे.
प्रश्न – आई वडीलांशिवाय आदि पासून जीवांची उत्पत्ती कशी झाली?
उत्तर – जीवाची उत्पत्ती आणि अंत नाही आहे.
प्रश्न – जीवाचा अंत नाही तर जगात मरते कोण आहे?
उत्तर – देह
प्रश्न – जन्म कोण घेतो?
उत्तर – चेतन माया
प्रश्न – मुर्ख कोण आणि चतुर कोण?
उत्तर – जीवच मुर्ख आणि जीवच चतुर
प्रश्न – मुर्ख आणि चतुर असण्याचे कारण काय?
उत्तर – ज्ञानाचे
प्रश्न– सत्यज्ञान कोणते?
उत्तर – आनंदपदाचे ज्ञान सत्य
प्रश्न – भक्ती कोणत्या स्थानापासून पैदा होते?
उत्तर – मागच्या जन्माच्या भक्तीच्या अंकुरने या जन्मात भक्ती पैदा होते.
प्रश्न – जीव भक्तीमध्ये कोणत्या स्थानात लागतो.
उत्तर – जीवाला सतगुरुशी प्रेम झाल्याने.
प्रश्न – शब्द कोणत्या अस्थानात लागतो.
उत्तर – शब्द रटल्याने शब्द जीवाच्या उरात प्रगटतो.
प्रश्न – भ्रम कोणत्या स्थानात(कशाने)जातो?
उत्तर – खरे खोट्याचा न्याय केल्याने भ्रम जातो.
प्रश्न – समाधी कोणत्या स्थानात लागते?
उत्तर – सत्ता स्थान म्हणजे दहाव्याद्वारात.
प्रश्न – जीव ब्रम्ह कशाने होतो?
उत्तर – सत्त ज्ञानाने जीव कोरा ब्रम्ह होतो.
प्रश्न – केवली ब्रम्ह कशाने होतो?
उत्तर – केवल ज्ञान घटात प्रगटल्याने
प्रश्न – वादळाचे घर कोणते?

उत्तर – सुन्न(आकाश)

प्रश्न – वादळ कशाने येते?

उत्तर – इंद्र देवाच्या इच्छेने

प्रश्न – सुन्न मध्ये विज चमकून उलटून कशा कशात सामावते?

उत्तर – विज सुन्न मध्ये चमकून सुन्नमध्ये ढगांमध्येच सामावते.

प्रश्न – ज्ञानरुपी महालाचा पाय(नींव)काय?

उत्तर – शील संतोष

प्रश्न – प्रेम कोठे राहते?

उत्तर – चित्तात

प्रश्न – मन कोठे पकड्ले जाते?

उत्तर – मन त्रिगुटीत पकड्ले जाते.

प्रश्न – कोणाचे मन केंव्हा पकड्ले जाते?

उत्तर– संताचे मन त्रिगुटीत ध्यान लागल्याने

प्रश्न – त्रिगुटीत ध्यान कशाने लागते?

उत्तर – गुरुच्या ज्ञानाने.

प्रश्न – आधी जग पैदा झाले की भक्त?आधी स्त्री पैदा झाली का पुरुष?आधी शिष्य पैदा झाला की सतगुरु?आधी राजा झाला की व्यास?आधी खरे झाले की खोटे?आधी सत्त पैदा झाले की नास्त?

उत्तर –जगत आधी झाले तर जगत भक्ती कोणी सांगितली आणि भगत आधी झाला तर जगत कसे उपजले.आधी स्त्री झाली तर पुरुषा शिवाय कशी झाली आणि पुरुष आधी झाला तर स्त्री शिवाय कोणी व्यास आणि गुरुदेव आधी झाले तर शिष्य आणि राजा कोठून उपजले. खोटे जर आधी झाले तर खऱ्याला कोणी सांगितले आणि खरे आधी जर झाले तर खोटे कसे उपजले.जर आधी नास्त पैदा झाले तर सत्तला होऊच देणार नाही कारण की दुष्मनाला पैदा कोण होऊ देईल?

प्रश्न-- – --- उत्तर------

१)ब्रम्हचा देश कोणता?-----ब्रम्ह सर्वव्यापी आहे.

२)ब्रम्हचे घर कोठे?-------संतांचा देह

३)ब्रम्ह वास कोठे करतो?----संतांच्या हंसात

४)त्याचे संत त्याला कसे जाऊन भेटतील?--दहाव्याद्वाराच्या बाहेर सतशब्द ध्वनीने

५)ब्रम्हमध्ये कोणत्या विधिने जाऊन मिळाल?--सतगुरु कृपेने येत्या जात्या श्वासात राम स्मरण केल्याने.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

६)ब्रम्हमध्ये मिळाल्याने काय सुख होते ?-----मायेच्या सुखांमध्ये तुलना करुन सांगता येत नाही.त्या सुखाच्या समोर विष्णूच्या वैकुंठाचे सुख कोठेच लागत नाही.

७)ब्रम्ह डोळ्यांनी कसा पहावा?--------संत व सतगुरुच्या रुपात

८)ब्रम्ह दृष्टीत कसा येतो?------संत व सतगुरु हाच परमात्मा आहे हे लखन्याने.

९)ब्रम्हशी गोष्ट कशी करावी?--------जीवाच्या निजमनाने

१०)ब्रम्हचा सर्व निर्णय सांगा?---ब्रम्हचा निर्णय बंकनाळेच्या रस्त्याने दहाव्याद्वारात पोहचल्यावर अनुभवाने येतो.

११)सुन्नचा आकार सांगा?----------सुन्न निराकार आहे.

१२)गिगन घराचे चिन्ह सांगा?-------गिगन घराचे चिन्ह मायेच्या शब्दांमध्ये वर्णन करता येत नाही.

१३)जर पोहचले असाल तर रस्त्यामधील घाट सांगा?---रस्त्यामध्ये पाताळ घाट, स्वर्ग,मेरु इत्यादी घाट आहेत.

१४)कोणते कोणते स्थान छेदन करुन सत जातात----१२ स्थान छेदन करुन संत जातात.१.कंठस्थान २.हृदयस्थान ३.मध्यस्थान ४.नाभीस्थान ५.लिंगस्थान ६.गुदाघाट ७.बंकनाळ ८.मेरुस्थान ९.त्रिगुटी १०.चिदानंदब्रम्ह ११.शिवब्रम्ह १२.पारब्रम्ह.

१५)कोणता देव कोणत्या स्थानावर आहे?---कंठस्थानावर सरस्वती,हृदय स्थानावर शंकर पार्वती,नाभी स्थानावर विष्णू लक्ष्मी,लिंग स्थानावर ब्रम्हा,गुदाघाटावर गणपती आणि मेरु स्थानावर यमराज आहे.

१६)त्याला कसे भेटावे कसे रहावे ते सांगा?----त्याला ब्रम्ह सुखाने भेटता येते. ब्रम्हचे रुप विचारत आहे तर जीवाचे रुप सांगा.जीव किती मोठा आहे जो सर्व ज्ञान मोठे मोठे ग्रंथ सर्व घटात बघून घेतो.श्वास उच्छ्वास कसे करतो श्वास सोडून परत कसा घेतो.जीवाचे रुप सांगा.जीवाचे रुप सुक्ष्म आहे,परंतु तो सतस्वरुप विज्ञानाने सर्व ग्रंथ घटात पाहून घेतो व श्वास उच्छ्वास घेत जातो.

भेरी वाजे कसे वाजवितो आहे जीव धापे त्याचे रुप प्रिती कशी येते?अनुभव भावाने असे ब्रम्हचे सुख येते

जीव सुख दु:ख दोन्ही जाणून कसे सांगतो?---ज्ञानाच्या आधाराने

भुख,भाव,भीती,विश्वास कसा आहे---------तृप्त सुखांची भुख आहे.तृप्त सुख देणाऱ्या संतांना पाहून रामजीवर भाव येतो.रामजीची भीती असते व तोच काळापासून सोड्वेल रंगाचा रंग गती सांगून देतो.

चित्त मे चितवन उपजे------चाहणावर

सुरत परदेश दोंडती है-----परदेशात पाहिलेल्या सर्व वस्तू क्षणात येथे सांगून देतो.

शंभर कोसावरची वस्तू या घटात येथे सांगून देतो.शंभर कोसावरची वस्तू जीव निरखून येथे पाहून घेतो.ब्रम्हचे रुप सांगतात.पण या जीवाचे रुप सांगा.रुप स्वरुपात पाहायचे आहे तर ब्रम्हच्या रुपात सर्व धरती,आकाश,वनराई,जल,स्थल,पवन,अग्नी,सर्व देव, मनुष्य,मुनी,राक्षस,ब्रम्हा,विष्णू,महादेव,समूळ शक्ती,शंभर फणांचा शेष सर्व ब्रम्हच्या रुपाच्या आत आहेत.

ब्रम्हची कळ नाही पडत-----तो अनुप आहे.अगाध आहे.अरुप आहे.अरुपी असल्याने रुप वर्णिले जात नाही.

जसे सुख संपदा मिळाल्यावर मनात मग्न होऊन जातात.तसे ब्रम्ह सुख मिळाल्यावर मनात मग्न होऊन जातात.

ढोलमध्ये नाद आहे,काशामध्ये झणकार आहे,ढगांमध्ये विज असेच संताच्या घटात ब्रम्ह राहतो

पाण्याची किंमत कोण जाणतो-----पाण्याची किंमत तहानलेला जाणतो असेच ब्रम्हची किंमत ब्रम्हज्ञानी जाणतो.

शेषाच्या डोक्यावरचा मणी आहे.तर कोण जाणून कोण सांगेल-----ज्याने बघितले तोच सांगेल.

मासोळी,मासा सर्व पाण्याच्या धारे समोर चालले जातात असे उलटून चढेल तोच साधू ब्रम्ह आहे.

ही गोष्ट जसे लाकडात चकमक,लोखंडात गारगोटीमध्ये आग आहे.पण भेदाने सांगितल्या -शिवाय याच्यात आग आहे मानणार नाही.

उसांत गोड्वा,दुधात तूप,तिळात तेल,किड्यात रेशम,अळीत भोवरा हे भेदीशिवाय मानत नाही.

जसे विना भेदाशिवाय सत संगत कसे कराल.अरुपी ब्रम्हचे रुप वर्णिले जात नाही.ब्रम्ह रुपात नाही सुखात वर्गीला जातो.तूप खाऊन त्याचा स्वाद कसा आहे कोणी सांगू शकत नाही.

जसे कामी पुरुष काम भोगाकरीता स्त्री संग करतो विचारल्यानंतर कसे आहे,काय उत्तर देईल.फुलात सुगंध आहे त्या सुगंधाचे रुप,रुपात नाही सुखात वर्गीले जाते.असे ब्रम्हचे सुख रुपात,सुखात वर्गीले जाते.

मासोळीचा रस्ता सांगता येत नाही.तसे ब्रम्हचे(रुप)रुख रुपाने वर्णन करता येत नाही.

**प्रश्न –** साधू,जग,पंडित,जैन सांगतात की,जसे जीव कर्म करतो तसे पुढे जीव योनी प्राप्त करतो.जे काही पाप पुण्य करतो,तर दुसरा देह धारण करुन केलल्या कर्माचे फळ दुसऱ्या योनीत जीव भोगतो.असे म्हणतात तर कसे?

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**उत्तर** – पाप पुण्याचा जगात भ्रम आहे.अनेक तऱ्हेच्या आणखी करण्या आहेत.तेथे जीव जन्म घेतो.हिंदूचे वेद,मुसलमानांचे किताब हे सांगतात की,अंतिम वेळी जीवाला शुध्द राहत नाही. शुध्द नाही राहणार तर आशा कशी राहील.मनाची आशा खरी नाही खोटी आहे.आता काही वस्तूची मनात आशा करा ती तुम्हाला मिळेल का?जसे होणार असते तसे जीवाचे होते.करणे,करविणे सर्व खोटे आहे.कर्म ही चांगले वाईट जसे होणार होते तसेच होते आहे.आदि सुरुवातीला जीव सर्व पैदा झाले.त्या दिवशी कोणते कर्म केले म्हणून जीव लक्ष चौऱ्यांशी, स्वर्ग,नर्कात जीव कसे पाठवून दिले.

**उत्तर** – आधी प्रथम जगाचा प्रलय झाला.त्या दिवशी जीवाचे आधीचे केलेले कर्म जसेच्या तसे राहीले.प्रलय काळात जीव कर्मांसहित ब्रम्हमध्ये सामावून गेला.जीव मागे जन्म घेतल्याने तेच कर्म आधी केलेल्या त्या कर्मांसहित जन्म घेऊन घेतला.कर्म ब्रम्ह मध्ये मिळाल्याने तुटत नाही आणि तेथे ब्रम्हमध्ये कर्म भोगले ही जात नाही. जीवाला देह मिळाल्याने कमी होतात आणि देह असल्याने जीव तीन लोकांमध्ये कर्म भोगतो आहे.सर्व देहाचे काम आहे.देह नाही तेंव्हा जीव तर ब्रम्ह आहे.या जीवाला पाप पुण्य काही लागत नाही. ।। इति प्रश्न उत्तरच्या अंगाच्या अर्थाचे भाषांतर अं.।।